शिक्षण शास्त्र संस्था, पुणे व राज्यपातळी
वरील इतर शैक्षणिक संस्थांची पुनर्रचना
करून " महाराष्ट्र राज्य शैक्षणिक
संशोधन व प्रशिक्षण परिषद, " या
संस्थेची पुणे येथे निर्मिती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन निर्णय, क्रमांक -पीटीसी १०८४/६८९५(२५/८४)माशि ४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक ३१ ऑगस्ट, १९८४

वाचावे :- १) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक प्रशिवि-४९८४/१०५९२/२४-८, दिनांक ३१.१.१९८४

२) उपसंचालक (पीएलजी) शिक्षण व सांस्कृतिक मंत्रालय (शिक्षण विभाग) प्लॅनिंग अँन्ड मॉनिटरी युनिट, केंद्र शासन, नवी दिल्ली यांचे एफ क्रमांक १४-४०(३) ८३पी अँन्ड एम, दि.१.२.१९८४ चे पत्र.

शासन निर्णय :- पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षण व्यवसाय मार्गदर्शन, दृकश्राव्य शिक्षण, इंग्रजी भाषेचे प्रशिक्षण, विज्ञान विषयातील प्रशिक्षण सुरू करावयाचे उपक्रम इ. साठी राज्य शासनातर्फे वेळोवेळी नवीन शैक्षणिक आणि शैक्षणिक क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नव्या क्षितीजाच्या अनुषंगाने संस्थांची राज्यपातळीवर स्थापना करण्यात आलेली आहे.

२. वर नमूद केलेल्या शैक्षणिक प्रशिक्षणात्मक, शैक्षणिक संशोधनात्मक व शैक्षणिक क्षेत्रातील नवीन पध्दतीबाबत राज्यात चालू असलेले शैक्षणिक कार्य प्रत्येक क्षेत्रात पृथकपणे कार्यान्वित आहे. " राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद," नवी दिल्ली, त्याचप्रमाणे केंद्र शासनाने प्रस्तावित केल्याप्रमाणे वर नमूद केलेल्या सर्व प्रकारच्या शैक्षणिक कार्यात एकसूत्रता कशाप्रकारे गुंफावी पृथकपणात सहकार्याची जोड कशी द्यावी, याबाबत गेली कांही वर्षे विचार होत होता. सांगोपांग विचारांती केंद्रशासनाच्या शिफारशीला अनुसरून राज्य शिक्षण शास्त्र संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई दृकश्राव्य शिक्षण संस्था, पुणे, राज्य आंग्ल भाषा शिक्षण संस्था मुंबई, राज्य विज्ञान शिक्षा संस्था नागपूर

संबंधित समितीच्या सभांना/ बैठकीला उपस्थित असणाऱ्या पदसिद्ध व नियुक्त सदस्यांना विहीत नियमानुसार प्रवासभत्ता व तदनुषंगिक खर्च मंजूर करण्यास शासकीय संमती देण्यात येत आहे. या समितीने कामकाजासाठी विशिष्ठ नियमावली संमत करून त्यास शासकीय मान्यता घ्यावी. सदस्य सचिव यांनी नियुक्त करावयाच्या सदस्यांबाबत सविस्तर प्रस्ताव त्वरित सादर करावा.

४. वर घोषित केलेल्या शासन निर्णयास अनुसरून शासनाने पुढील अनुषंगिक निर्णयही घेतले आहेत. शिक्षणशास्त्र संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या संस्थेचे नामांतर ''महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद'', पुणे असे करण्यास शासकीय संमती देण्यात येत आहे. सदर संस्थेचे इंग्रजी भाषेतील नामांतर '' महाराष्ट्र स्टेट कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँन्ड ट्रेनिंग," पुणे असे करण्यास शासकीय संमती देण्यात येत आहे. संबंधित परिषद ही शासकीय यंत्रणा म्हणूनच कार्यरत राहील. या नवीन परिषदेमध्ये समाविष्ट झालेल्या इतर शैक्षणिक संस्थांचे नामांतर योग्य त्या प्रकारे करण्याचा अधिकार संबंधित परिषदेला आहे.

५. या नवीन परिषदेकरिता संचालकाचे पद निर्माण करण्यात येत आहे. वरील परिस्थितीत संचालक, शिक्षणशास्त्र संस्था, हे पदनाम रद्द करून त्या पदनामाऐवजी त्या पदाचे पदनाम ''सहसंचालक, ''महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद'' असे करण्यास शासकीय मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संस्था व प्रशिक्षण परिषद या संस्थेमध्ये समाविष्ट करावयाच्या संस्थांमध्ये सध्या अस्तित्वात असलेला अधिकारीवर्ग, कर्मचारीवर्ग व उपलब्ध यंत्रणा यामध्ये या स्थितीला वैशिष्ट्यपूर्ण असा बदल करण्यात येत नाही. मात्र या परिषदेची रचना कशाप्रकारची असावी याबाबतचा सविस्तर प्रस्ताव संबंधित परिषदेने कार्यक्रम सल्लागार समिती यांचेशी विचार विनिमय करून शक्य तितक्या लवकर शासनास सादर करावा.

असा प्रस्ताव सादर करताना ज्या रूपरेषेवर ही परिषद निर्माण करण्यात आली आहे. त्या रूपरेषेवर सदर प्रस्ताव आधारित असावा. १९८४-८५ हे आर्थिक वर्ष कार्यान्वित असताना सदरील फेरबदल झाल्यामुळे या परिषदेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या संस्थांच्या प्रमुखांना उपलब्ध करून देण्यात आलेली आर्थिक तरतूद, वित्तीय अधिकार अगर अंदाजपत्रकातील भूतपूर्व संस्थांच्या नावे असलेली तरतूद यामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरबदल न करता,

८. संचालकांच्या कार्यालयासाठी एक व त्यांच्या निवासस्थानी एक असे दोन दूरध्वनी मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. दूरध्वनी बसविण्याची कार्यवाही तात्काळ हाती घेण्यात यावी.

९. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद या संस्थेकरिता एक संचालकांचे पद निर्माण करण्यात आले आहे. परिणामी सध्या अस्तित्वात असलेल्या संचालकांचे (राज्य शिक्षणशास्त्र संस्था, पुणे) पदाचे नामांतर सहसंचालक, महाराष्ट्र राज्य, शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे म्हणून करण्यात आले आहे. संचालकांचे पद निर्माण करण्यांत आलेले असल्यामुळे पूर्वीच्या संचालकांना असलेले अधिकार नव्याने निर्माण करण्यांत आलेल्या संचालकांना प्रदान करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

१०. या नवीन निर्माण करण्यांत आलेल्या पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या दराने महागाई भत्ता, स्थानिकपूरकभत्ता, घरभाडे भत्ता इत्यादीसाठी पात्र समजण्यात यावे. त्याचप्रमाणे ही पदे ज्या श्रेणीमध्ये आहेत त्या श्रेणीमधील अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या इतर सर्व शासकीय सोयी- सवलती त्यांना उपलब्ध आहेत व सेवे बाबतचे नियम त्यांचेवर बंधनकारक आहेत.

११. शैक्षणिक संशोधनाच्या दृष्टीने सध्या अस्तित्वात असलेली राज्य शिक्षणशास्त्र संस्था, पुणे ही पुणे विद्यापीठाशी संलग्न आहे. नव्याने स्थापन झालेल्या परिषदेने सदर संलग्नता या परिषदेला देखिल चालू ठेवण्याबाबत विद्यापीठाशी स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करावा. शैक्षणिक कार्याच्या दृष्टीने संचालक, शिक्षणशास्त्र संस्था, पुणे हे विविध समित्यांचे प्रतिनिधी आहेत. या सर्व समित्यांवरील प्रतिनिधी म्हणून यापुढे संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांना प्रतिनिधीत्व करावे.

-६-

१२

१२. या परिषदेच्या स्थापनेमुळे होणारा अधिक खर्च हा ''२७७ शिक्षण - एच - सर्वसाधारण (बीवी) प्रशिक्षण - बीवी - (दोन पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - ए - शिक्षक प्रशिक्षण २७७ १५०७'' मागणी क्रमांक ९७ या शीर्षाखाली १९८४-८५ या शैक्षणिक वर्षाकरिता अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यांत यावा.

१३. वरील शासन निर्णय हा वित्त विभागाच्या संमतीने त्यांचेकडील अनौपचारिक संदर्भ क्र. ७४२९ सी आर १४११- व्यय-५ दि. १९.९.१९८४ ला अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

( श. गो. देठणकर)

सचिव

शिक्षण विभाग

प्रत -

शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य पुणे

शिक्षण संचालक (उच्चशिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे

संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पुणे ३०.

महालेखापाल, महाराष्ट्र - १ मुंबई

महालेखापाल, महाराष्ट्र - ३ नागपूर

संचालक शिक्षणशास्त्र संस्था, पुणे ३०

इत्यादी इत्यादी ..

(खरी नक्कल)

प्रशासन अधिकारी

शिक्षणशास्त्र संस्था, पुणे ३०.